# 'प्रारंभ'ने पटकाविला 'साय-फाय करंडक'

म. टा. प्रतिनिधी, पुणे

पुणे पोलिसांच्या सहकार्याने भरत नाट्य मंदिर येथे झालेल्या 'साय-फाय करंडक २०१७' या अभिनव अशा एकांकिका स्पर्धेत प्रारंभ संस्थेच्या 'वाट' या एकांकिकेने विजेतेपद पटकावले तर, अनबॉक्स संस्थेच्या 'फोर्थ डायमेन्शन' या एकांकिकेस सांघिक द्वितीय आणि जॅकारांडा संस्थेच्या 'मिशन परफेक्शन' या एकांकिकेस उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात आली.

दिग्दर्शक सुनील सुकथनकर, गिरीश जोशी, पुणे पोलिसांच्या सायबर क्राइम विभागाचे उपायुक्त सुधीर हिरेमठ, अभिनेता सुयश टिळक, पर्ण पेठे, कैलाश काटकर, प्रदीप वैद्य यांच्या उपस्थितीत विजेत्यांना सन्मानित करण्यात आले. या वेळी विजेत्यांच्या मोठमोठ्या घोषणांनी वातावरण दणाणून टाकले होते.

साय-फाय करंडकासाठी पुणे, मुंबई, औरंगाबाद, कोल्हापूर, गोवा आणि नागपूर या सहा केंद्रांतून संघ सहभागी झाले होते. अंतिम फेरीत २० संघांत लढत झाली. अभिनेता आलोक राजवाडे आणि अश्विनी गिरी यांनी अंतिम फेरीसाठी परीक्षक म्हणून काम पाहिले.




'साय-फाय करंडक २०१७' स्पर्धेतील यशस्वी संघासह दिग्दर्शक सुनील सुकथनकर, अभिनेता सुयश टिळक, पर्ण पेठे, कैलाश काटकर, प्रदीप वैद्य आणि सायबर क्राइम विभागाचे उपायुक्त सुधीर हिरेमठ.